आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२ फेब्रुवारी २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातल्या रेल्वेसाठी २३हजार ९२६ कोटी रुपयांची तरतूद केल्याची रेल्वेमंत्र्यांची माहिती

- संसदेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला सुरूवात

- राज्यात विविध ठिकाणी महापौरपदासाठी उमेदवारांचे अर्ज दाखल

- पुण्यातल्या पोर्श अपघात प्रकरणातल्या ३ आरोपींना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ९४४ अंकांची वाढ /सोन्या-चांदीच्या दरातली घसरण कायम

**<><><><><>**

आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातल्या रेल्वेसाठी २३ हजार ९२६कोटी रुपयांची विक्रमी तरतूद केल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. नवी दिल्लीतून घेतलेल्या वार्ताहर परिषदेत त्यांनी राज्यातल्या पत्रकारांना दूरस्थ पद्धतीनं संबोधित केलं. राज्यात मुंबई ते पुणे आणि पुणे ते हैदराबाद या दोन बुलेट ट्रेन्सनाही या अर्थसंकल्पात मान्यता दिली आहे. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मुंबई ते पुणे हा प्रवास ४८ मिनिटांवर येईल, तर पुणे ते हैदराबाद १ तास ५५ मिनिटांत पोहोचता येईल, असं त्यांनी सांगितलं. यामुळे या तिन्ही शहरांना खूप फायदा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कालच्या अर्थसंकल्पात मान्यता मिळालेला नवा मालवाहतूक कॉरिडॉर राज्यातल्या वाढवण बंदरालाही जोडण्याची योजना आहे. यामुळे देशभरात मालवाहतुकीचं जाळं तयार होईल, असं ते म्हणाले. राज्यात एकंदर १ लाख ७० हजार कोटी रुपयांचे रेल्वेचे प्रकल्प सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचं काम वेगानं सुरू असून पुढच्या वर्षी ही ट्रेन सुरू होईल, याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

**<><><><><>**

लोकसभेत आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला सुरूवात झाली. राष्ट्रपतींचा संदेश अतिशय महत्त्वपूर्ण होता असं म्हणत केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी धन्यवाद प्रस्ताव मांडला. देशाच्या भविष्याविषयी अतिशय प्रभावी दृष्टीकोन राष्ट्रपतींनी या भाषणात व्यक्त केला. सामाजिक न्याय, सर्वसमावेशक विकास आणि विकसित भारताचं सरकारचं  उद्दिष्ट यात प्रतिबिंबित होत असल्याचं सोनोवाल म्हणाले. त्यानंतर खासदार तेजस्वी सूर्या यांनी यावर भाषण केलं. गेल्या १२ वर्षात केंद्र सरकारवर एकही भ्रष्टाचाराचा आरोप झाला नसल्याचं ते यावेळी म्हणाले. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी यावर बोलायला सुरुवात केल्यावर सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी त्यांच्या काही मुद्द्यांवर आक्षेप घेतला. त्यानंतर झालेल्या गदारोळामुळं लोकसभेचं कामकाज आधी २ वेळा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब झालं.

**<><><><><>**

राज्यसभेत आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरच्या धन्यवाद प्रस्तावावरच्या चर्चेला सुरूवात झाली. या चर्चेसाठी १६ तास  देण्यात आले आहेत. राष्ट्रपती मुर्मू यांनी त्यांच्या भाषणात विकसित भारताच्या दिशेनं भारताच्या प्रवासाचा स्पष्ट दृष्टिकोन मांडल्याचं नामनिर्देशित सदस्य सी सदानंद मास्टर यांनी धन्यवाद प्रस्ताव मांडताना सांगितलं. राष्ट्रपतींचं अभिभाषण भारताच्या सातत्यपूर्ण प्रगतीवर प्रकाश टाकत असल्याचं, भाजपच्या मेधा कुलकर्णी यांनी प्रस्तावाला पाठिंबा देताना सांगितलं.

दरम्यान, सरकार शेतकरी आणि कामगारविरोधी असल्याचा आरोप काँग्रेसचे दिग्विजय सिंह यांनी केला. डिजिटल प्रणालीमुळे सायबर फसवणूक आणि डेटा घोटाळे होण्याची शक्यता वाढली आहे, तसंच वायू प्रदूषण आणि जल प्रदूषण वाढल्यामुळे आर्थिक नुकसान होत असल्याचं तृणमूल काँग्रेसच्या सागरिका घोष म्हणाल्या.

केंद्रीय अर्थसंकल्पात आरोग्य आणि कृषी क्षेत्रांसाठी कमी निधी वाटप केल्याबद्दल ‘आप’चे संजय सिंह यांनी सरकारवर टीका केली. जदयू चे संजय कुमार झा, द्रमुक चे तिरुची शिवा आणि समाजवादी पक्षाचे राम गोपाल यादव यांनीही चर्चेत भाग घेतला.

**<><><><><>**

**ठाणे** जिल्ह्यातल्या ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि उल्हासनगर या तिन्ही महापालिकेत महिलांना महापौरपद देण्याचा निर्णय शिवसेनेनं घेतला आहे. ठाण्यातून

शर्मिला पिंपळोलकर-गायकवाड, कल्याण डोंबिवलीत हर्षाली थविल चौधरी आणि उल्हासनगरमध्ये अश्विनी निकम यांची महापौरपदी वर्णी लागणार आहे.

**नागपूरमध्ये** आज भाजपाच्या नीता ठाकरे यांनी महापौर पदासाठी तर लीला हाथीबेड यांनी उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन पत्र सादर केलं. काँग्रेसकडून महापौर पदासाठी स्नेहल ठाकरे तर उपमहापौर पदासाठी विवेक निकोसे यांनी अर्ज दाखल केले आहेत. नागपूरचं महापौर पद सर्वसाधारण महिला गटासाठी राखीव आहे. नागपूरमध्ये शुक्रवारी महापौर, उपमहापौरपदाची निवडणूक होणार आहे.

**अमरावतीमध्ये** भाजपनं श्रीचंद तेजवानी यांना महापौरपदाची उमेदवारी जाहीर केली आहे.

**धुळे** महापालिका महापौर पदासाठी आज भाजपाकडून मायादेवी परदेशी यांनी तर उपमहापौर पदासाठी ज्योत्स्ना पाटील यांनी अर्ज दाखल केले. तसंच शिवसेनेच्या गिता नवले यांनी महापौर पदासाठी आणि इरफान फजलु अन्सारी यांनी उपमहापौर पदासाठी नामनिर्देशन पत्र भरलं आहे.

**चंद्रपूर** महापालिकेत महापौर पदाची प्रक्रिया लवकरच सुरू होणार असून त्याआधी काँग्रेस महासचिव के. सी वेणुगोपाल यांच्याबरोबर उद्या दिल्लीत बैठक होणार आहे. या बैठकीनंतर तोडगा निघेल असं काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.

**अहिल्यानगरमध्ये** महापौरपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्योती गाडे तर उपमहापौर पदासाठी भाजपाच्या धनंजय जाधव यांनी आज आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.

**नाशिक** जिल्ह्यातल्या मालेगाव महापालिकेत, महापौर पदासाठी इस्लाम पक्षाच्या शेख नसरीन खालीद हाजी यांनी तर उपमहापौर पदासाठी समाजवादी पक्षाच्या शान-ए-हिंद यांनी आज आपले अर्ज दाखल केले. अर्ज दाखल करण्याचा उद्याचा शेवटचा दिवस असून निवडणूक येत्या शनिवारी होणार आहे. मालेगावचं महापौरपद महिला प्रवर्गासाठी राखीव आहे.

**कोल्हापूरमध्ये** महापौरदासाठी भाजपानं रूपाराणी निकम यांच्या नावाची घोषणा केली आहे. मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ही घोषणा केली. कोल्हापूरमध्ये येत्या शुक्रवारी निवडणूक होणार आहे.

<><><><><>

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांमध्ये येत्या शनिवारी, ७ फेब्रुवारी रोजी सार्वत्रिक निवडणूका होणार आहेत. या निवडणुकीत राज्यातल्या आणि राज्याच्या सीमेलगतच्या भागातल्या सर्व मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी उद्योग, आस्थापना आणि कारखान्यांनी आपले कामगार आणि कर्मचाऱ्यांना या दिवशी भरपगारी सुट्टी अथवा सवलत देणं बंधनकारक आहे. उद्योग, उर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागानं आज याबाबतचं परिपत्रक जारी केलं.

<><><><><>

पुण्यात २०२४मध्ये झालेल्या पोर्श अपघात प्रकरणातल्या तीन आरोपींना सर्वोच्च न्यायालयाने आज जामीन मंजूर केला. सतीश गायकवाड, आदित्य सूद आणि आशीष मित्तल अशी या तीन आरोपींची नावं आहेत. आरोपींनी दाखल केलेल्या जामीन अर्जांवर आज न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि उज्ज्वल भूयान यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. जामीन मंजूर करताना न्यायालयाने अल्पवयीन मुलांचा समावेश असलेल्या गुन्ह्यांसाठी पालकांना जबाबदार धरायला हवं, अशा शब्दांत ताशेरे ओढले.

<><><><><>

मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणात पुणे पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रात दिग्विजय पाटील आणि पार्थ पवार यांचं नाव नाही. यात केवळ शीतल तेजवाणी यांचा उल्लेख आहे. पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेनं न्यायालयात १ हजार ८८६ पानांचं आरोपपत्र दाखल केलं आहे.

<><><><><>

अर्थसंकल्पानंतर मोठ्या प्रमाणात घसरलेले देशातले शेअर बाजार आज सावरले. दिवसअखेर सेन्सेक्स ९४४ अंकांची दमदार तेजी नोंदवून ८१ हजार ६६६ अंकांवर बंद झाला. तर निफ्टी २६३ अंकांनी वधारुन २५ हजाराच्या पातळीच्या वर येऊन २५ हजार ८८ अंकांवर स्थिरावला. काल झालेल्या घसरणीनंतर गुंतवणूकदारांनी समभागांची खरेदी केल्यानं शेअर बाजारात वाढ दिसून आली.

सोन्या-चांदीच्या दरात ४ दिवसांपासून सुरू असलेली घसरण आजही कायम आहे. गेल्या ४ दिवसात चांदी किलोमागे १ लाख २० हजार रुपयांनी स्वस्त झाली आहे. सध्या

मुंबईच्या सराफा बाजारात चांदीचे दर किलोमागे २ लाख ६७ हजार रुपयांच्या पुढे आहेत. गेल्या ४ दिवसात सोनंही सुमारे २६ हजार रुपयांनी स्वस्त झालं आहे. सध्या एक तोळा २४ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ५३ हजार रुपये आणि १ तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ४९ हजार रुपये मोजावे लागत आहेत.

**<><><><><>**

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणासंदर्भात भाजपाच्या वरीष्ठ नेत्यांना विचारावं लागेल, असं अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिकमधे बातमीदारांशी बोलत होते. विलिनीकरणाबाबत दिवंगत नेते अजित पवार यांची कुणाशी काय चर्चा झाली याची आम्हाला कुणालाही कल्पना नाही. आता बदललेल्या परिस्थितीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली चर्चा करावी लागेल, सामुदायिकरीत्या त्यावर निर्णय घ्यावा लागेल, सत्तेत सोबत असल्यानं भाजपाचाही विचार घ्यावा लागेल, असं ते म्हणाले.

अजित पवार यांच्या विमानाला झालेली दुर्घटना हा अपघात होता, यात संशयास्पद काही वाटत नसल्याचही त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकण आणि विदर्भात हवामान कोरडं राहील.

//<><><><><>//